# सचिन तेंडुलकरची २३ दिवसांची हजेरी आणि महिना २० हजारांचे पेन्शन! याबद्दल कोण बोलणार?

संपादकीय

जयश्री खाडिलकर-पांडेकृत

भारताचा लाडका क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर याला २७ एप्रिल २०१२ रोजी राज्यसभेची खासदारकी बहाल केली. क्रीडा क्षेत्राबाबत प्रश्न विचारून आणि अभ्यासपूर्ण सूचना देऊन हा क्रिकेटचा देव क्रीडा क्षेत्राचे भले करील असे वाटले होते. पण २०१२ पासून २०१७ पर्यंत सचिन तेंडुलकर गप्प राहिला. काल २१ डिसेंबरला तो पहिल्यांदा बोलायला उभा राहिला तेव्हा माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या अपमानाचा मुद्दा उपस्थित असल्याने गदारोळात त्याला बोलता आले नाही. सचिन तेंडुलकरला बोलू दिले नाही म्हणून सत्ताधारी बवाल करीत आहेत, पण २०१२ ते २०१७ या वर्षांत सचिन तेंडुलकरने केवळ २३ दिवस राज्यसभेत हजेरी लावली त्याचे काय? याबाबत कुणी प्रश्न का विचारत नाही?

राज्यसभेवर विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची नेमणूक करण्याची अत्यंत उत्तम तरतूद आहे. या तज्ज्ञांनी त्यांच्या क्षेत्रातील त्यांचा अनुभव व अभ्यास यावर आधारित सूचना करून व प्रश्न विचारून त्या क्षेत्रात सकारात्मक प्रगती व्हावी याचा प्रयत्न करावा हा त्यामागचा उद्देश आहे. मात्र या उद्देशाला सातत्याने हरताळ फासला जात आहे. स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांना राज्यसभेचे खासदार केले. त्या संपूर्ण काळात त्या एकही दिवस सभागृहात हजर राहिल्या नाहीत. सिनेकलावंत रेखा यांना हा मान दिला तर त्यांची केवळ १८ दिवसांची उपस्थिती आहे आणि सचिन तेंडुलकर २०१२ ते २०१७ या काळात केवळ २३ दिवस उपस्थित आहे. ही त्याची उपस्थितीही येऊन सही करून एक दोन तास थांबण्यापुरती असते. सचिन तेंडुलकरच्या अनुपस्थितीला कोणते कारणही नाही. कारण संसदीय अधिवेशने सुरू असताना आयपीएल सामन्यांना उपस्थिती यापासून जाहिरातींच्या चित्रीकरणात सचिन मश्गुल असल्याची छायाचित्रं त्या त्या वेळी प्रसिद्ध झाली होती. खासदारकीच्या जबाबदारीपेक्षा व्यावसायिक भूमिका अधिक महत्त्वाची ठरली होती. खासदारकीच्या शपथविधीवेळीचा थाटमाट झाल्यानंतर सचिनची उपस्थिती जाणवलीच नाही. सचिनला बोलू दिले नाही म्हणून बवाल करणारे याबाबत सवाल का करीत नाहीत?

राज्यसभेत नियुक्त होऊन खासदारकी मिळाली की, दरवर्षी ५ कोटींचा फंड देशभरात कुठेही खर्चासाठी मिळतो. हा फंड कुठे आणि कशासाठी खर्च करायचा हे खासदाराने फक्त लिहून द्यायचे असते. त्यानंतरचे सर्व काम स्थानिक जिल्हा प्रशासन करते. सचिन तेंडुलकर अलीकडे त्याने दत्तक घेतलेल्या डोंजा गावात गेला तेव्हा त्याच्या निधीतून गावात पूर्ण झालेली कामे बघायला गेला होता. त्याआधी त्या गावी सचिन गेलाही नाही. नियुक्त खासदाराला दरवर्षीच्या ५



कोटी रुपयांच्या फंडासह दर महिना ५० हजार रुपये पगार मिळतो. दिल्लीत राहायचे असल्यास मोफत निवासस्थान मिळते, कुटुंबासह ३४ विमान उड्डाणे मोफत असतात, दरवर्षी ५० हजार फोनकॉल मोफत मिळतात, पाणी व वीज बिलावर मोठी सूट लाभते, रेल्वे वा रस्ता प्रवासाचे भत्ते दिले जातात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे खासदारकीचा पूर्ण काळ संपला की दर महिना २० हजार रुपये निवृत्तीवेतन सुरू होते. प्रत्येक खासदारावर इतका मोठा खर्च केला जातो तर त्या खासदाराने त्याच्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्याच पाहिजेत आणि या जबाबदाऱ्या पूर्ण करता येत नसतील तर खासदारकीचा राजीनामा द्यायला हवा.

सचिन तेंडुलकर महान क्रिकेटपटू आहे यात संशय नाही. क्रिकेटपटू म्हणून त्याच्याबद्दल खूप आदर व कौतुक आहे. त्याने देशाचे नांव उंचावले आहे. हे सर्व त्रिवार सत्य असले तरी खासदार म्हणून त्याने जबाबदारीने कार्य केलेले नाही हेही सत्य आहे आणि आपल्या इतर कार्यक्रमांमुळे ही जबाबदारी पूर्ण करता येत नसेल तर त्याने खासदारकीचा राजीनामा देऊन दुसऱ्या एखाद्या तज्ज्ञाला संधी द्यायला हवी. २६ एप्रिल २०१८ म्हणजे पुढच्या वर्षी सचिनचा खासदारकीचा कार्यकाळ संपतो. क्रिकेटच्या मैदानात शतके ठोकणाऱ्या सचिनने राज्यसभेत मात्र भोपळाही फोडला नाही. गानसम्राज्ञी लता मंगेशकर असो, सचिन तेंडुलकर असो नाहीतर अभिनेत्री रेखा असो अशा महान कलाकारांना राज्यसभेत स्थान देऊन त्यांच्या अभ्यासाचा आणि अनुभवाचा त्यांच्या क्षेत्रालाही काही उपयोग होणार नसेल तर राज्यसभेवर हे तज्ज्ञ नेमण्याच्याबाबतीत यापुढे नेमणूक करताना काही कडक अटी ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

सचिन तेंडुलकरची २३ दिवसांची हजेरी, त्याने केवळ २०१५, २०१६ मध्ये विचारलेले २२ लेखी प्रश्न आणि चार वर्षांनंतर सभागृहात बोलण्याचा केलेला एकमेव प्रयत्न इतकाच त्याच्या खासदारकीचा आलेख आहे. यानिमित्ताने तज्ज्ञांना खासदारकी देण्याच्या तरतुदीचा पुन्हा विचार व्हायलाच हवा. महान व्यक्तिमत्त्वांच्या विरोधात बोलले तर जनतेचा रोष पत्करावा लागतो म्हणून अनेकजण गप्प राहतात. मात्र सुधारणा करायची असेल तर मत ठामपणे मांडावेच लागेल.